# समाजस्वास्थ्य

संपादक
र. धों. कर्वे, एम. ए.

वर्ष २६, अंक ६ वा    १५ दिसेंबर १९५२    किंमत ४ आणे



# अनुक्रमणिका


| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | विवाहसंस्थेवर आधुनिक आक्षेप–२ ... | १०५ |
| २ | क्रिस्ती आक्षेपकांची हजीरी ... ... | ११० |
| ३. | बुद्धिवादी नास्तिक कां असतात? ... ... | ११३ |
| ४. | पत्रव्यवहार ... ... ... ... | ११६ |
| ५. | शारदेचें पत्र ... ... ... ... | १२० |



## अेजंटांचीं नांवें

**मुंबई :** श्री. वागवे, न्यूज एजंट, खटाववाडी, गिरगांव.

**पुणें :** अेल्. के. जोशी, बुकसेलर.
डी. अेच्. शहा, बुकसेलर.

**अहमदनगर :** पी. जी. बापट, बुकसेलर, नवी पेठ

**निपाणी :** के. एस्. बळगुर्गी

**कुमठा :** आर्. एम्. कामत

**गोकाक :** पी. एम्. शिरगांवकर


**समाजस्वास्थ्य** मासिक

यांत वाचकांच्या कामविषयक अडचणींना उत्तरें दिलेलीं असतात, परंतु कायद्याच्या अडाणीपणामुळें सर्वच प्रश्नांना मासिकांत उत्तरें देता येत नाहीत. ज्यांना खाजगी पत्राने उत्तर पाहिजे असेल, त्यांनी आगाऊ वीस रुपये पाठवावे, म्हणजे रजिस्टर पोस्टाने उत्तर मिळेल. **संपादक.**

अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय.

# विवाहसंस्थेवर आधुनिक आक्षेप–२

स्त्री ही पुरुषाची मालमत्ता आहे. ही कल्पना अलीकडे कोणी उल्लेखिलीच तर ती केवळ निषेध करण्याकरतांच हें जरी खरें, तरी या प्राचीन कल्पनेचे अवशेष अजूनही सर्वत्र दिसतात उदाहरणार्थ अेखाद्याची बायको कोणाला चुकून जरा नागवी दिसली, तरी त्याला अितका भयंकर धक्का बसतो की त्याला खाणेंपिणें देखील सुचत नाहीसें होतें. तिचें शरीर किंवा निदान त्या शरीराचा कांही भाग पाहण्याचा हक्क फक्त आपलाच आहे आणि तो दुसऱ्या कोणाला दिसला तर आपलें भयंकर नुकसान झालें, असें अजूनही नवऱ्यांना वाटतें.

ही भूमिका नग्नतेच्या पुरस्कर्त्यांच्या विशेष लक्षांत येते. नग्नतेला पुरुषांचा विरोध मुख्यतः अेवढ्याकरतांच असतो की आपल्या बायकोचें नग्न शरीर दुसऱ्याला दिसणें हा केवढा अनर्थ, असें त्यांना वाटतें. अेक पत्रकार यासंबंधी जिज्ञासेने जर्मनींत प्रवास करीत असतां अेकदां चौदा नग्न तरुणी त्याच्या दृष्टीस पडल्या. तेव्हां त्याच्या मनांत प्रथम विचार आला तो असा की या तरुणी लग्नानंतर नवऱ्यांना नग्न पाहतां येतील, पण मलाही त्या तितक्याच नग्न दिसल्या. स्त्रीच्या शरीराचे कांही विशिष्ट भाग पाहण्याचा हक्क फक्त नवऱ्याचाच आहे, ही कल्पना सुधारलेल्या लोकांत देखील सांपडते. हा मालकीहक्क नाहीतर काय आहे ?

हा मालकीहक्क स्त्रियांनीही पुरुषांवर सांगितला नाही असें नाही, पण त्याबद्दल अितका आरडाओरडा झालेला नाही अितकेंच. पण सुधारलेल्या देशांत सुद्धां स्त्रीने नवऱ्याला व्यभिचारांत पकडतांच त्याचा खून केला, तर तिला शिक्षा होत नाही, कारण तिला साहजिकच राग येऊन तिने रागाच्या भरांत खून केला ही सबब पुरते. म्हणजे न्यायाधिशांना स्त्रीचा मालकीहक्क कबूल असतो, असाच याचा अर्थ आहे यापेक्षांही विलक्षण गोष्ट अेका डाक्तरानें सांगितली आहे की अेक अधिकारी कैद्यांना खच्ची करीत असे, परंतु अेकदां अेका कैद्याच्या बायकोने त्याला विचारलें की तुला वाटलें तर त्याचें नाक, कान, हात, पाय तोडण्याचा तुला हक्क आहे, पण ज्या भागांवर माझा हक्क आहे ते तूं काय म्हणून कापणार ?

प्रसिद्ध रशियन लेखक टॉलस्टॉय याच्या बायकोचीही अशीच कल्पना होती. बिचारा टॉलस्टॉय लग्नानंतर नऊ महिन्यांनी लिहितो, ' माझा मीपणा कोठें गेला ? माझी काय किंमत आहे ? आणि सर्वांत आश्चर्य हें की माझ्या बायकोवर माझें प्रेम आहे आणि तिच्यामुळेंच माझी अशी स्थिति झाली आहे. मला खरें लिहिण्याची देखील चोरी, कारण ती माझ्या मागें उभी राहून वाचते. ' आणि धार्मिक लोकांना लग्नांतून कधीच सुटका नसल्यामुळें टॉलस्टॉयने अखेरपर्यंत असे हाल काढले. टॉलस्टॉयसारख्या माणसाचे असे हाल व्हावे, यापेक्षां विवाहसंस्थेविरुद्ध काय पुरावा पाहिजे ? त्याची बायको त्याला अेकसारख्या धमक्या देत असे की तूं अमुक केलेंस तर मी जीव देअीन. शेवटीं त्याने तिला लिहिलें की तूं असशील तेथली हवा देखील विषारी होते. आणि हा अपवाद नाही. असे विवाह पुष्कळ असतात. अर्धांगी हा शब्द लोक मोठ्या प्रेमाने वापरतात, पण त्यांतच या गुलामगिरीचा समावेश होतो.

कित्येक लोकांची तर कोणत्याही प्रकारचें बंधन पतकरण्याची तयारी नसते आणि त्यांचे विवाहाने किती हाल होतात याची कल्पना जज्ज लिंडसे यांनी दिली आहे. त्यांनी अेक असें उदाहरण दिलें आहे की कांही दिवस

अेकत्र राहण्याचा अनुभव घेतल्यानंतर दोन माणसें विवाहबद्ध झालीं आणि नंतर त्यांना असें आढळून आलें की विवाहाचें बंधन असह्य आहे. म्हणून त्यांनी घटस्फोट घेतला आणि नंतर तीं पुन्हा विवाहित जोडप्याप्रमाणेंच अेकत्र राहूं लागलीं. कित्येकांना हा चमत्कार वाटेल, पण तो चमत्कार नाही. स्वतंत्र बाण्याच्या लोकांना बंधन सहन होत नाही. बंधन असलें की तें तोडण्याची बुद्धि होते. हें पुष्कळांना हल्ली अगोदरपासूनच कळत असल्यामुळें पुष्कळ लोक हल्ली विवाह करायला नाखुष असतात.

याचीच दुसरी अेक बाजू म्हणजे कित्येक विवाहित जोडप्यांनी अेकमेकांना समागमाचे बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य दिलें आहे अितकेंच नव्हे तर तीं याचें समर्थन करतात. लेअॉ ब्लं या प्रसिद्ध फ्रेंच समाजवाद्याने विवाहसंस्थेवर अेक उत्तम पुस्तक लिहिलें व त्याला अेकदां अेका स्त्रीने उघड सांगितलें की व्यभिचाराने विवाहातील सर्व अडचणी नाहीशा होतात आणि याकरतां व्यभिचाराचें समर्थन करणें जरूर आहे. जज्ज लिंडसे यांनी अमेरिकेंतही या मताचा प्रसार झाल्याचें लिहिलें आहे. अशा रीतीने शरीरावरील मालकीहक्काची कल्पना हळूहळू मागें पडत आहे आणि लोकमताचा ओघ याच दिशेने चालू राहिला तर विवाहसंस्थेचें स्वरूप अजीबात बदलण्याचा संभव आहे हें उघड दिसतें.

अिंग्लंडांत अेका खटल्याचे वेळीं मॅकार्डी नांवाच्या न्यायाधिशाने १९३२ सालीं सांगितलें की अिंग्लंडांतील कायद्याप्रमाणें बायकोला वाटल्यास नवऱ्याला सोडून जाण्याचा हक्क आहे. या बाबतींत गेल्या पन्नास वर्षांत पत्नीची स्थिति सुधारली आहे आणि नवऱ्याला तिच्याशीं आदराने वागावें लागतें, जबरदस्ती करतां येत नाही. हिंदुस्थानांतही बायको नवऱ्याला सोडून गेल्यास तिला कोणतीही शिक्षा होत नाही. नवरा कोर्टांत गेल्यास तिने नवऱ्याजवळ रहावें असा हुकूम कोर्टाकडून मिळतो, परंतु त्याची अंमलबजावणी करण्यास कोर्टाकडून मदत मिळत नाही. मॅक्स नॉर्डो म्हणतो कीं आमरण अेकनिष्ठ राहिलेलें जोडपें कदाचित् दहा हजारांत अेखादें

सापडेल आणि जन्मभर टिकणारें विवाहाचें बंधन जर अगोदरच अस्तित्वांत नसतें, तर तें आज कोणालाही सुचलें नसतें.

जेथें घटस्फोटाची परवानगी नाही, तेथें व्यभिचाराला उत्तेजन मिळतें ही गोष्ट निर्विवाद आहे. कोणी म्हणेल की घटस्फोटाने देखील व्यभिचार अजीबात बंद झालेला नाही. हें खरें आहे, कारण घटस्फोट कोठेही सोपा नाही. तो शक्य तितका कठिण करण्याचीच प्रवृत्ति सर्वत्र दिसते आणि व्यभिचार सोपा असतो. त्यांत कितीही अडचणी असल्या तरी तो अेकंदरीत सोपाच असतो. रोमन कॅथोलिक पंथांत घटस्फोटाला परवानगी नसते, पण प्रॉटेस्टंट पंथांत असते. हिंदु धर्मांत घटस्फोटाची कल्पना अलीकडची आहे आणि ती कायद्याने आणली आहे, धर्माने नव्हे. अर्थात् कित्येक स्मृतींत अमुक अमुक झालें असतां स्त्रीला दुसरा पति करतां येतो असें सांगितलें असलें तरी तशी रूढि नव्हती, आणि 'शास्त्राद्रूढिर्बलीयसी' हेंच तत्व सर्वत्र लागू होतें. पण जन्मभर बंधनांत रहावें लागल्याचे परिणाम कित्येक वेळां अितके भयंकर होतात की केवळ याच कारणामुळें पतीचा किंवा पत्नीचा खून झाल्याचीं उदाहरणें थोडीं नाहीत. विवाहाचे वेळीं जन्मभर अेकनिष्ठ राहण्याच्या शपथा मनुष्याने कितीही प्रामाणिकपणें घेतल्या असल्या, तरी सारा जन्म हालांत काढण्याची शक्ति फारच थोड्या लोकांना असते यांत आश्चर्य नाही. पुढें काय होअील याची कल्पना शपथा घेतांना नसते आणि अशा शपथा कोणाला घ्यायला लावणें हा निष्ठुरपणा आहे, अितकेंच नव्हे तर ही चाल भयंकर आहे. लग्नापूर्वी अनुभव घेण्याची परवागी नसल्यामुळें अेखादेवेळीं लग्नाच्या दुसऱ्याच दिवशीं अेकाला दुसऱ्याबद्दल वीट येतो आणि त्याच्या बरोबर सारा जन्म काढण्याची कल्पना देखील सहन होत नाही. समागमाचा अनुभव दोघांनाही असतां कामा नये, अशी धार्मिक अट निदान प्रथम विवाहाचे वेळीं असते. तेव्हां पहिल्याच रात्रीं समागमाने दोघांची मनःस्थिति अजीबात पालटणें शक्य आहे, विवाह ही आपण भयंकर चूक केली, असें निदान दोघांपैकीं अेकाला वाटणें शक्य

असतें आणि या चुकीची शिक्षा सारा जन्म भोगावी लागणार असें दिसल्यास अेखादा मनुष्य जीव देअील किंवा अेखादा खून करील यांत नवल काय ?

ज्यांत अेकदां सांपडलें म्हणजे सुटका नाही, अशा विवाहासारख्या उंदरांच्या सांपळ्यांत जाण्यास कोणीही बुद्धिमान मनुष्य तयार होणार नाही हें उघड आहे. पण तारुण्याच्या भरांत पुष्कळांना अितका विचार सुचत नाही. कित्येक लोक, विशेषतः पुरुष, प्रेमांत सांपडल्यामुळें आणि अिष्ट स्त्रीच्या प्राप्तीला विवाहाशिवाय दुसरा मार्ग नसल्यामुळें विवाह करतात, पण त्यांनाही मागाहून पश्चात्ताप करण्याची वेळ येते. सुखी विवाह अेकंदरींत विरळाच असतात.

शरीराने अेकनिष्ठ राहणारे स्त्रीपुरुष पुष्कळ वेळां मनाने अेकनिष्ठ नसतात आणि केवळ वैचित्र्याची संधि न मिळाल्यामुळेंच अेकनिष्ठ राहतात. कित्येकांना तर या बाबतींत रुचिपालट करण्याची अितकी निकड भासते की तशी संधि न मिळाल्यास त्यांची प्रकृति बिघडते. अेकेरी विवाहाची पद्धत अलीकडे सर्व सुधारलेलीं म्हणवणारीं राष्ट्रें कायद्याने प्रस्थापित करतात, व तीं असें धरून चालतात कीं प्रत्येक पुरुषाला व स्त्रीला जन्मभर अेकनिष्ठ राहण्यांत समाधान वाटतें. परंतु हें वस्तुस्थितीला धरून नाहीं. यूरोप-अमेरिकेंत देखील अेकेरी विवाहाचा कायदा अलीकडचा आहे. बायबलांत त्याचा मागमूस नसताही क्रिस्ती म्हणवणाऱ्या देशांनी तो अंमलांत आणला आहे. परंतु ज्यांना वैचित्र्याची जरूर भासते, त्यांचें अशा विवाहाने कधींही समाधान होणें शक्य नाही. त्यांचे मतें विवाह म्हणजे फसवणूकच असते, त्यांतही कित्येक जोडप्यांची कामप्रकृति जमत नाही. कित्येकांना समागम म्हणजे संकट वाटतें, पण त्यांच्या सहचाऱ्यांना तो उत्कटतेने पाहिजे असतो. अशा स्थितींत त्यांना वैवाहिक आयुष्य म्हणजे नरकयातना वाटल्या तर नवल काय ?

मग अितके लोक लग्नें कां करतात ? हें समजणें कठिण नाही. सामाजिक निर्बंधामुळें स्त्रियांना तर विवाहाशिवाय कामशांतीचा दुसरा मार्गच नसतो. पुरुषांना देखील आपली वैचित्र्याची आवड उघडपणें बोलून

दाखवण्याची छाती नसते, मग त्यांची वागणूक कशीही असो. पण आतां ही स्थिति बदलली आहे. लोक कामवासनेचा शास्त्रीय दृष्ट्या विचार करूं लागले आहेत आणि पुष्कळ देशांत घटस्फोटाची परवानगी आहे. उत्तर अमेरिकेंत समागमावरील निर्बंध अत्यंत कडक आहेत, पण तेथें कायदेशीर घटस्फोट सोपा आहे. शंभर वर्षांपूर्वीच स्तांदाल नामक फ्रेंच कादंबरीकाराने जर्मनीबद्दल लिहिलें आहे की जर्मनीची सुखी कुटुंबांबद्दल प्रसिद्धि आहे, परंतु तेथें नुकतेंच अेका बऱ्या घराण्यांतील स्त्रीनें चौथा विवाह थाटाने करून अगोदरच्या तिन्ही नवऱ्यांना समारंभाला बोलावलें. अिराण-मधेंही अशीच स्थिति होती असें दिसतें. अेका लेखकाने लिहिलें आहे की तेथे चोवीस वर्षांच्या स्त्रीने तिसरा किंवा चौथा विवाह करणें अपवादात्मक नव्हतें. तेव्हां या बाबतींत अमेरिकेंत कांही नावीन्य आहे असें नाही. मात्र अमेरिकन स्त्रियांना अनेक विवाह करून अनेक नवऱ्यांकडून पोटगी उपटण्याची जी संवय आहे, ती अिराणांत नव्हती. तेथें केवळ वैचित्र्याच्या आवडीमुळेंच अनेक विवाह होत असत.

प्रत्येक बाबतींत वैचित्र्याची गरज आणि त्यापासून होणारे फायदे लोक कबूल करतात, मग विवाह हाच तेवढा अपवाद कां मानावा? हें नैसर्गिक नाही आणि निसर्गाशीं भांडण करून मनुष्याचा केव्हांच निभाव लागणार नाही. निसर्गाविरुद्ध कायदे केल्यामुळेंच लोकांना व्यभिचार करवासा वाटतो आणि त्यांना दोष देतां येत नाही. निसर्गाला आळा घालण्याचे सर्व प्रयत्न फोल होतात यांत आश्चर्य नाही.

---

# क्रिस्ती आक्षेपकांची हजीरी

आपला धर्मच सर्वांचा तारक आहे, जो क्रिस्ती नसेल तो नरकांत जाअील, अशी घमेंड बाळगणारे क्रिस्ती मिशनरी येथें येऊन लोकांना क्रिस्ती करण्याचा उद्योग करीत असतात हें सर्वांना माहीत आहे. या

घमेंडखोर लोकांना किती महत्व द्यावें हा प्रश्नच आहे, परंतु ते नसते उपद्व्याप करूत लोककल्याणाच्या आड येऊं लागले म्हणजे त्यांची दखल घ्यावी लागते. अशाच प्रकारचा अेक उपद्व्याप त्यांनी येथील कुटुंबनियोजन परिषदेच्या निमित्ताने केला आहे. प्रथम त्यांनी या परिषदेतच येऊन धूडगूस घालण्याचा बेत केला होता, परंतु ही परिषद् विरोधकांकरतां नाही असें सडेतोड उत्तर त्यांना मिळाल्यामुळें त्यांनी अेक संततिनियमन-विरोधी चोपडें काढून परिषदेच्या अगोदर कित्येक भागांत घरोघर वांटलें. हें चोपडें म्हणजे निवडक मूर्खपणाचा मासला आहे, हें खालील कांही नमुन्या-वरून समजेल.

पहिल्याच पानावर लिहिलें आहे की **प्रत्येक मूल म्हणजे अीश्वराची देणगी आहे**. यांचा अीश्वर अितका बेअकली कसा? ज्यांना मुलें पोसण्याची ताकत नसेल त्यांना अशा देणग्या देणें म्हणजे बेअकलीपणा नव्हे काय? संततिनियमन ही चूक आहे असें दाखवण्याकरतां त्यांनी म्हटलें आहे की 'संततिनियमन म्हणजे समागम करतांना बेकायदा साधनांनी प्रजोत्पत्ति टाळणें.' हा कायदा कधीं कोणीं केला? आणि तो आम्ही कां पाळावा? 'कृत्रिम साधनांनीच नव्हे तर कोणत्याही रीतीने संतति टाळणें चूक आहे, दुर्गुण आहे आणि दुर्गुणाचा कोणत्याही कारणाने सद्गुण होत नाही', हें आणखी अेक विधान पहा. केवळ दुर्गुण म्हटल्याने तो दुर्गुण होत नाही. ज्याचा परिणाम वाअीट होअील तोच दुर्गुण. संततिनियमनाचा कोणताही वाअीट परिणाम होत नाही हें सर्वांना माहीत आहे. त्याला दुर्गुण म्हणणें म्हणजे शिवी आहे, यथार्थ वर्णन नाही.

आणखी कांही खोटीं विधानें पहा. संततिनियमनाने नीति बिघडते असें विधान त्यांनी जमनादास मेहता यांच्या माथीं मारलें आहे. तें त्यांनी केलें असेल तर ती त्यांची चूक आहे. विवाहबाह्य समागम ही अनीति आहे असें जरी क्षणभर धरून चाललें, आणि या अनीतीला संततिनियमनाने पाठिंबा मिळतो असें जरी कोणीं म्हटलें, तरी त्याचा अर्थ अितकाच होतो की कांही

लोक संततिनियमनाच्या साधनांचा दुरुपयोग करतात. पण म्हणून हीं साधनें कोणींच वापरूं नये म्हणणें हा मूर्खपणा आहे. विस्तवानें स्वयंपाकही करतां येतो किंवा आगही लावतां येते. कांहीं लोक आगी लावतात किंवा लावतील, म्हणून विस्तवाचा वापरच बंद करावा काय? किंवा विस्तव वापरणें हा दुर्गुण होतो काय? गांधींजींचें मत सर्वश्रुतच आहे, परंतु तेंही मूर्खपणाच आहे. परवांच श्री. राधाकृष्णन् यांनी सांगितलें की गांधीजींचें साधन म्हणजे आत्मसंयमन, हें देखील नैसर्गिक नाहीं, निसर्गविरुद्धच आहे. तेंच चांगलें कां आणि अितर कृत्रिम साधनें वाईट कां, हें कोणाला सांगतां येअील काय?

'संततिनियमनाचे पुरकर्ते नैतिक मुद्दा टाळतात' असें किरिस्तांवांचें म्हणणें आहे, परंतु आम्ही तो बिलकुल टाळीत नाहीं. नीति म्हणजे काय हें ठरवतांना परिणामाकडे पाहिलें पाहिजे, अेकदरींत समाज कशानें सुखी होतो हें पाहिलें पाहिजे. कांहीं लोक दुरुपयोग करतील म्हणून ती अनीति होत नाहीं. दुरुपयोग कशाचा करतां येणार नाहीं? विषाचा उपयोग औषधि म्हणूनही होतो किंवा प्राणनाशाकरतांही होतो. लिहायला शिकलें म्हणजे लोक खोट्या सह्या करतील, म्हणून लिहिणेंच सोडून द्यावें काय? ही बेअकलीपणाची शिकस्त आहे. कोणीही समंजस मनुष्य हें कबूल करणार नाहीं. संतति मर्यादेंत ठेवल्यानें व्यक्तीचें तर कल्याण होतेंच, परंतु कोणत्याही समाजाचें व सर्व जगाचेंही कल्याण त्यांतच आहे. आज जगभर अन्नाचा तुटवडा कशानें पडला? लोकसंख्या फाजील आहे म्हणून. ती मर्यादेंत ठेवण्याचा अेकच मार्ग म्हणजे संततिनियमन. मग तो दुर्गुण कसा असेल? ज्यानें कल्याण होतें तो दुर्गुण ठरवणें, यांत काय शहाणपणा आहे? किरिस्तांवांच्या धर्मगुरूंची याला परवानगी नसेल, पण किरिस्तांवांना त्याचें महत्व वाटत असेल, तर त्यांनी संततिनियमन करूं नये. अितरांना त्याचें बंधन नाहीं.

या किरिस्तांवांचें म्हणणें असें की विवाहबाह्य समागमाला यानें सूट मिळते. पण या किरिस्तांवांना सर्वच समागम म्हणजे पाप वाटतें व तसें

या चोपड्यांत म्हटलेंच आहे. त्यांचा अेक संत पॉल नांवाचा होता, त्यानें म्हटलें आहे की समागम म्हणजे पापच आहे, पण तुम्हाला रहावतच नसेल, तर हें पाप करून नरकांत जाण्यापेक्षां विवाह करा. त्याचें मूळचें वाक्य असें आहे की 'जळण्यापेक्षां विवाह करणें बरें.' म्हणजे विवाह करणें ही देखील पापाला परवानगीच आहे. मग संततिनिमनालाच नांवें ठेवण्याचा त्यांना काय अधिकार आहे ? मूळ पाप समजलेल्या गोष्टीला जर लग्नाची युक्ति काढून परवानगी देतां येते, तर संततिनियमनानें विवाहबाह्य समागमाला वाव मिळतो या म्हणण्यांत काय अर्थ आहे ? पापांतून मार्ग काढण्याची क्रिस्ती धर्माची पद्धतच आहे. पाप करून देखील तें कबूल केलें म्हणजे झालें, अशी सूट क्रिस्ती धर्मांत ठेवलेलीच आहे. पाद्र्याजवळ पापांचा पाढा वाचला म्हणजे मनुष्य पापमुक्त होतो, ही कल्पना क्रिस्ती धर्मांतच आहे.

अीश्वराविषयीं पाहिजे त्याने पाहिजे त्या गप्पा माराव्या, कारण तो बिचारा कांहीच बोलत नाही. अीश्वर असलाच तर आपल्याला अक्कलही त्यानेच दिली असली पाहिजे. तिचा उपयोग करायचा की नाही अेवढाच प्रश्न राहतो. या चोपड्यांत आणखीही बरीच धूळफेक केली आहे, पण येथें सर्वच मुद्यांचा परामर्श घेतां येत नाही. क्रिस्त्यांनी आपली अक्कल पोपकडे गहाण टाकली असली, तर त्यांनी संततिनियमन पाहिजे तर करूं नये, त्यांच्यावर कोणी सक्ती करीत नाही. पण अशा तऱ्हेने आपल्या अकलेचें प्रदर्शन करूं नये. पोप कांही म्हणाला तरी आज त्याचे असंख्य अनुयायी संततिनियमन करीत आहेत असा अनुभव आहे. मग अितर लोक या गप्पांनी फसतील अशी त्यांची कल्पना आहे काय ?

---

# बुद्धिवादी नास्तिक कां असतात ?

## ( अेका फ्रेंच लेखाचे आधारें )

कोणाला माझ्या बाजूला वळवण्याकरतां मी बोलत नाही. मी बुद्धिवादी असल्यामुळें कोणाच्याही प्रामाणिक श्रद्धेला मी मान देतों. मी फक्त माझ्या

नास्तिकतेचें तर्कशुद्ध समर्थन करणार आहें. पुष्कळांना असें वाटतें की नास्तिक म्हणजे ज्या विषयांत आपल्याला कांही कळत नाही, किंवा फारसें कळत नाही, त्याबद्दल अद्वातद्वा विधानें करणारा मनुष्य. ही समजूत चुकीची आहे अेवढेंच मी दाखवणार आहें.

अमुक श्रद्धा चुकीची आहे, असें नास्तिकाला सिद्ध करण्याचें कारण नसतें. त्याचें म्हणणें अितकेंच की लोक ज्याला देव म्हणतात, आणि जो सर्वशक्तिमान, सर्वज्ञ असून त्याने हें सर्व जग उत्पन्न केलें असें मानतात, तसा कोणीही असणें तर्कदृष्ट्या शक्य नाही. पुष्कळ धर्मांत त्याचें असें वर्णन केलें आहे, मग तपशिलांत कितीही फरक असो. या सगळ्या कविकल्पना आहेत, त्यांत सत्याचा अंश असणें शक्य नाही, अितकेंच मला म्हणायाचें आहे. जग कसेंही उत्पन्न झालें असो, पण तें कोणाही अेका व्यक्तीने उत्पन्न केलेलें असणें शक्य नाही. जीवशास्त्र, ज्योतिःशास्त्र, भूगर्भशास्त्र, वगैरे शास्त्रांनी अर्थातच अीश्वर नाही असें सिद्ध केलेलें नाही, परंतु त्यांत अीश्वराचा प्रश्नच उपस्थित होत नाही. मला अितकेंच सांगायचें आहे की जगांत ज्या नियमबद्ध घटना आपल्याला दिसतात, त्या पदार्थांच्या स्वभावसिद्ध गुणांमुळें घडतात, आपोआप घडतात, त्यांकरतां अीश्वर गृहीत धरण्याचें कारण पडत नाही. तेव्हां अीश्वराची कल्पना या दृष्टीने निरुपयोगी आहे आणि अितर दृष्टींनी ती अशक्य आहे. यावरून अीश्वर नाही असेंच बुद्धिवाद्यांना म्हणावें लागतें, कारण निष्कारण कोणतीही गोष्ट गृहीत धरायची नाही, असा शास्त्रीय पद्धतीचा नियम आहे.

माझेंच म्हणणें खरें माना असा माझा आग्रह नाही, परंतु जगांतील सर्व गोष्टींचा उलगडा करण्याकरतां जो सिद्धांत सर्वांत जास्त यशस्वी ठरेल, तोच तात्पुरता तरी खरा मानायचा, असा शास्त्रीय पद्धतीचा नियम आहे. अर्थात् त्यापेक्षां जास्त सरळ रीतीने उलगडा करणारा दुसरा अेखादा सिद्धांत निघाला, तर पहिला खोटा किंवा अपुरा ठरेल, पण अीश्वराच्या अस्तित्वाच्या सिद्धांताने बिलकुल उलगडाच होत नाही आणि आस्तिकांना नेहमी

'ओश्वराची करणी अगाध आहे' वगैरे समजुतींमागें लपण्याचा प्रसंग येतो, तेव्हां तो खोटा मानल्याशिवाय गत्यंतर नाही. ओश्वराची कल्पना जुनी आहे व ती सर्वांच्या अंगवळणीं पडलेली आहे, म्हणूनच लोक ती मानून चालतात, कारण लोकांना विचार करायला नको असतो.

व्हिक्टर ह्यूगो नांवाच्या प्रख्यात फ्रेंच लेखकाने लिहिलें आहे, 'ज्याला अनंताची कल्पनाच करतां येत नाही, तो नास्तिक,' कारण अनंताच्या कल्पनेनें ओश्वराचें अस्तित्व सिद्ध होतें असें त्याचें म्हणणें होतें. पण वस्तु-स्थिति बरोबर उलट आहे. काल हा अनादि आणि अनंत आहे हें जर खरें, तर तो कोणीं उत्पन्न केला असणें कसें शक्य आहे ? कारण तो उत्पन्न केला असेल, तर तो त्यापूर्वी नव्हता असें म्हणावें लागेल. मग तो अनंत कसा ? तेव्हां अनंताने सर्व जग उत्पन्न करणारा ओश्वर बिलकुल सिद्ध होत नाही.

कित्येक लोक ओश्वरालाच अनंत म्हणतात आणि हा अनंत आपल्याला पाहतो, आपल्यावर देखरेख करतो आणि शेवटीं आपल्याला न्याय देतो, अशी त्यांची कल्पना असते. या उलट नास्तिकाची अशी खात्री असते की आपल्याला असा कोणीही पहात नाही आणि या अनंत जगांत आपलें आयुष्य क्षणिक आहे आणि नंतर तें नाहीसें होणार. आस्तिकांचा अनंत मानलेला ओश्वर सर्व जग उत्पन्न करून शिवाय प्लेग, भूकंप, क्षयरोग, नरक, अित्यादि भयंकर गोष्टी उत्पन्न करतो आणि शिवाय तो दयाळू पण आहे. आस्तिकांचा हा समज विसंगत आहे, तो खरा कसा मानतां येअील ?

ओश्वराच्या अस्तित्वाला कोणताही पुरावा नाही, तो केवळ श्रद्धेवर अवलंबून आहे. श्रद्धेचा फायदा अितकाच की तीपुढें कोणताही वाद टिकत नाही. श्रद्धा आणि बुद्धि या दोहोंत मूलभूत विरोध आहे. कोणतीही गोष्ट पुराव्याशिवाय खरी मानायची नाही, हा बुद्धीचा नियम आहे आणि कोणी सांगेल तें खरें मानायचें, त्याबद्दल विचारच करायचा नाही, हा श्रद्धेचा नियम. परंतु हल्लीच्या चिकित्सक युगांत श्रद्धेला स्थान नाही. बाबावाक्य

किंवा आप्तवाक्य काय म्हणून खरें मानायचें? ज्यांना विचारच करतां येत नाहीं, ज्यांना दुसऱ्याचाच आधार लागतो, असे लोक मानतील, पण ज्यांना कांहीं बुद्धि आहे, ज्यांना विचार करतां येतो, ते श्रद्धा ठेवणार नाहीत. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांत फरक नाहीं. जें विचारानें खरें ठरतें, त्याला श्रद्धा लागत नाहीं. श्रद्धा म्हणजे विचार केल्याशिवाय खरें मानणें, म्हणजेच अंधश्रद्धा, म्हणूनच बुद्धिवादी मनुष्य नास्तिक असतो, विचारशून्य श्रद्धाळू लोक आस्तिक असतात.

---

# पत्रव्यवहार

## १

१. आपण आगस्टच्या अंकांत माझें नांव व पत्ता ग्राहक म्हणून छापलींत, तसेच अितर समविचारी अिसमांनी आपणांस कळवावे व आपण ते छापावे. २. सप्टेंबरच्या अंकांत 'मस्ती' व 'उन्माद' सारख्या मासिकांचा खप त्यांतील चित्रांमुळें व कामुकतेमुळें होतो असें आपण लिहिलें आहे व मलाही तें बरोबर वाटतें. पण मग आपण तशा कामुक चित्रांस व गोष्टींस त्याज्य समजत नसल्यास खप वाढवण्याकरतां तशा सामुग्रीचा उपयोग कां करीत नाही? आपण म्हणाल की सध्यांच मासिकाचा व्यवहार आंतबट्याचा आहे, मग अशा सामुग्रीचा खर्च कसा सोसावा? तर मला वाटतें की आपणास जी थैली अलीकडे मिळाली आहे, तिच्या आधारें आपण नमुन्यादाखल असा प्रयोग अेक वर्षभर करून पहावा व ग्राहक वाढल्यास चालू ठेवावा. सध्यांच्या युगांत केवळ ध्येयवादानें चालणार नाहीं......३. तसेंच आपल्या मासिकांतील लिखाण बहुतेक अेकहाती असतें, त्यांत अितर लेखकांचे थोडें साह्य मिळाल्यास रुचिपालट होईल. तें आपण आपल्या वैयक्तिक ओळखीनें व मासिकांतून जाहीर विनंति करून मागवावें. ४. आपल्या ग्राहकांकडून 'मी स्वास्थ्याचा वाचक कां झालों?' या विषयावर लेख मागवावे. मी अेक पाठवण्याचें आश्वासन देतों. ५. जून १९४८ च्या अंकांत डॉ. ॲलन यांचें

मत दिलें आहे की ' प्रकृति चांगली रहायला पाहिजे असेल, तर स्त्रीपुरुषांचा समागम शक्य तितक्या लवकर झाला पाहिजे. प्राथमिक स्थितींतल्या सर्व गटांत विवाह लवकर करण्याची चाल असते.' तरमग समागमाची अिच्छा निर्माण होअील त्या वेळीं त्यांस समागमाची संधि देणें श्रेयस्कर काय? ऋतुप्राप्तीपूर्वी मुलीस अिच्छा होते काय व होत असल्यास ती पुरवावी काय? जापला अेक ग्राहक.

उ. १. कोणी पाठवल्यास छापूं. २. ' मस्ती ' व ' उन्माद '-सारख्या मासिकांशीं चढाओढ करण्याची आमची अिच्छा नाही व खटले करून घेण्याचीही नाही. थैलीचा असा उपयोग म्हणजे दुरुपयोग होअील असें आमचें मत आहे. ३. लेखकांना मोबदला मिळावा असें आमचें मत आहे व तो देण्याची अैपत नसल्यामुळें आम्ही कोणाजवळही लेख मागत नाही. जे कांही अितरांचे लेख येतात, ते त्यांनी पैशाची अपेक्षा न ठेवतां पाठवलेले असतात. अर्थात् ते बरे वाटल्यासच आम्ही छापतों. लेखांकरतां लाचारी पतकरण्याची आमची तयारी नाही. ४. पानें थोडीं असल्यामुळें नवीं सदरें सुरू करतां येत नाहीत. ५. प्राथमिक गटांपेक्षां आपली स्थिति बरीच वेगळी आहे, तेव्हां तशी संधि देण्यांत सामाजिक धोका आहे. तेव्हां केवळ प्रकृतीकडे पाहून चालणार नाहीं. ऋतुप्राप्तीपूर्वी फार तर जिज्ञासा असेल, पण समागमाची अिच्छा नसते. **सं.**

२

' सन्डे टाअिम्स ' मधें ' द शूटिंग आउटरेज ॲट द सॅव्हॉय ' हें सदर वाचून पुढील विचार सुचले. ' प्रिन्स ' हा किताब विकत घेणाऱ्या मनुष्या-बरोबर मॅडॅम फामी फ्रान्समधून अिजिप्तमधें येते. त्याच्या अचाट श्रीमंती-बद्दल बोलायलाच नको. शिवाय ' प्रिन्स ' या शब्दाबरोबर त्याची विषयासक्ति, सुंदर मुली गांठण्याची व पळवण्याची धडपड व त्यांच्या अितर लीला, यांची अेकदम वास्तविक कल्पना डोळ्यांसमोर उभी राहते. त्या बाअीने पहिल्या नवऱ्याशीं काडीमोड कां केली, हें समजण्यास मार्ग

नाही व त्यामुळें तिच्याबद्दल आणखी थोडी माहिती मिळाली असती, तिला मात्र आपण मुकलों. पैसा व अितर सर्व सुखसाधनांची अनुकूलता असतांनाही तिने नवऱ्याचा सहा महिन्यांतच खून करावा, याचें साधारण मनुष्याला आश्चर्य वाटेल, पण नवऱ्याच्या वर्णनांत व तिच्या बचावांत घातलेले विशेष शब्द 'विकृत कामवासना', 'पशुतुल्य आचरण,' वगैरे, यांना माझ्या मतें महत्व आहे. अर्थात् जूरीचें किंवा तिच्या वकिलाचेंही त्याकडे फारसें लक्ष गेलेलें दिसत नाही. जजाबद्दल बोलायलाच नको, त्याचा निकाल जूरीवरच अवलंबून असायचा. कामवासनेची विकृति हा एक विषय आहे, याची कोणालाच माहिती असलेली दिसत नाही. तो नवरा होता हीच बाब सर्वांच्या पुढें होती व त्या कल्पनेवरच निकाल लागला व लोकही 'चांगला न्याय मिळाला' म्हणत घरोघर निघून गेले. अमाप पैसा, तीव्र व हिडिस आणि किळसवाणी संभोगेच्छा व तिच्या वाढीस जरूर असणाऱ्या साधनांची अनुकूलता आणि त्यांत तिच्या मोठ्या, सुंदर डोळ्यांची व चमकणाऱ्या हास्याची भर पडलेली. या वैशिष्ट्यामुळें तो संभोगाचे वेळीं उल्लू बनून तिच्यावर आत्यंतिक जुलूम करीत असावा. तेवढ्यापुरतें तरी 'नको तें जीवन' असें तिला वाटत असावें. अेखाद्या मुलीचें नाक किंवा डोळेच सुंदर म्हणून आपल्याला तिचा लाभ होत नसल्यास ते कापणें किंवा फोडणें, छाती सुंदर असल्यास तेथेंही जखम करून ती विद्रूप करणें, किंवा दुसऱ्या कोणाला लाभ होऊं नये म्हणून तिचा खून करणें, अशा तऱ्हेचे अनेक प्रकार होतात. पण या विकृतींचें शास्त्रीय स्वरूप आपल्याकडे कोणाच्या लक्षांत येत नाही. खुनाच्या दिवशींचें त्याचें तिच्याशीं वागणें, गळा दाबणें, व जीव घेण्याची धमकी देणें, हें विकृतीचेंच निदर्शक नाही का? त्याची प्रतिक्रिया म्हणून तिने धीटाअीने केलेला विरोध व त्याचा झालेला परिणाम अयोग्य नव्हता असेंच म्हणावें लागेल. त्याने तिचा गळा दाबला व खुनाचें भीषण प्रात्यक्षिक तिला दाखवण्याचा प्रयत्न केला, ही बाब कायद्याच्या कक्षेंत आली नाही. पण तिने त्याला पिस्तूल दाखवलें व धमकी दिली हें हिशोबांत

धरलें नाही ही माझ्या मतें चूक होय. जज्जाने किंवा जूरीनेही याचा विचार केला नाही, यावरून त्यांच्या यासंबंधी शास्त्रीय ज्ञानाची कल्पना येते. तिचा वकीलही तिने पौर्वात्याशीं लग्न केलें म्हणून हा प्रसंग ओढवला, असें सांगून मोकळा होतो, तिने दिलेलीं उत्तरें मोठीं मार्मिक आहेत. १. माझें त्याच्यावर प्रेम होतें, म्हणून मी विवाह न करतांही त्याच्याजवळ रहायला तयार होतें. २. माझें दुःख माझ्या मैत्रिणींना कळावें असें मला वाटत नव्हतें. मित्रमैत्रिणी नको म्हणत असतांही ती त्याच्याबरोबर गेली असावी व चार-सहा महिन्यांतच विचित्र अनुभव आल्यामुळें तो त्यांना सांगणें नासुष्कीचें वाटलें असावें. अेवढेंच नव्हे तर काडीमोडीकरतां लागणारें नवऱ्याचें नातें लोकांसमोर यावें हेंही तिला आवडत नव्हतें. ३. मी त्याचा द्वेष करींत नव्हतें, पण तो ज्या गोष्टी मला करायला सांगे त्या मात्र मला आवडत नसत. म्हणजे तो अितर दृष्टींनी चांगला मनुष्य होता असा याचा अर्थ होत नाही काय? तात्पर्य आपल्यापेक्षां दहा वर्षांनी वडील अशा काडीमोड केलेल्या सुंदर स्त्रीशीं लग्न करण्याच्या मुळाशीं त्याची तीव्र विषयवासनाच असावी आणि त्या वासनेचें हिडिस, ओंगळ स्वरूप तिला असह्य वाटल्यामुळें व प्रसंगीं आपल्या जिवावरही बेतेल या भीतीनेच तिने तो मार्ग अनुसरला असावा. फक्त काडीमोड घेतल्यास आणखी कोणाला तो त्याच मार्गाने नेअील असेंही तिला वाटलें असल्यास नवल काय? **अेक डॉक्टर.**

उ. ती प्रेमाने वेडी झाली होती हें उघड दिसतें व त्याची कामवासना विकृत होती हेंही उघड दिसतें. अशा विकृतींची कल्पना कायदेबाज लोकांना, म्हणजे जज्जांना व वकिलांना देखील नसते, तेव्हां जूरीमधल्या सामान्य लोकांना कोठून असणार? वकिलाने आपलें काम चोख केलें. त्याचें काम तिला निर्दोष ठरवण्याचें होतें, खोलांत शिरून मूलगामी विचार करण्याचें नव्हतें. तेथील सर्व लोक पाश्चात्य असल्यामुळें 'पौर्वात्य लोक हे असेच असायचे,' हें त्यांना ताबडतोब पटणार हें त्याला माहीत होतें. मग तो जास्त खोलांत कां शिरेल? **सं.**

---

# शारदेचें पत्र

स्वतःची जाहिरात करण्याकरतां लोक काय काय आचरटपणा करतील, हें सांगणें कठिण. आतां ' प. पू. श्री. ' गोळवलकर गुरुजींनी गोवधबंदीची मोहीम सुरू केली आहे आणि याकरतां कायदा करावा असें त्यांचें म्हणणें आहे. ते स्वतःला हिंदु धर्माचे पाठीराखे समजतात, परंतु त्यांना हिंदु धर्माची फारशी माहिती दिसत नाही. वैदिक काळांतले ब्राम्हण गोमांस खात होते याबद्दल भरपूर पुरावा आहे आणि हे आतां गोवधबंदीची चळवळ करतात! यांना हिंदु कां म्हणावें? ते गायीला माता म्हणतात आणि गोमाता हा शद्ब भाषेंत देखील रूढ झाला आहे. पण हें सगळें जैनांकडून उसनें घेतलेलें आहे, हें गुरुजींना कां माहीत नसावें? हल्ली मरतुकड्या गुरांना जगवण्याच्या हट्टामुळें चांगल्या गुरांना अन्न मिळेनासें झालें आहे. गोवधबंदीचा कायदा केल्यास गायी कोणालाच मारतां येणार नाहीत आणि हल्लीची स्थिति आणखी विकोपाला जाओील. गोमांस हा हिंदुस्थानांत देखील अन्नाचा अेक प्रकार आहे आणि हल्ली जैनांना शरण गेलेले हिंदु गोमांस खात नसले, तरी मुसलमान आणि क्रिस्ती लोकांची संख्या कांही कमी नाही आणि ते सगळे गोमांस खातात. अितकेंच नव्हे तर मांसाहारी लोकांना हेंच मांस स्वस्त पडतें. अर्थात् ज्याला गोमांस म्हणतात तें सर्वच गोमांस नसतें, त्यात रेड्यांचेंही मांस असतें. परंतु गोमांस हा अन्नाचा प्रकार नाहीसा झाला तर अन्नाची हल्लीपेक्षांही अधिक टंचाओी पडेल, अितकेंच नव्हे तर या निधर्मी राज्याला मुसलमानांवर आणि क्रिस्त्यांवर जुलूम केल्याचें श्रेय लाभेल! असा जुलूमच करायचा असेल तर याला निदान निधर्मी राज्य म्हणूं तरी नये, म्हणजे लोकांची फसवणूक होणार नाही.

गोवधबंदीला ते जीं कारणें लावतात, तीं तर अगदीच गैरलागू आहेत. खरें पाहिलें तर गायीला कोणीच माता मानीत नाही. मानीत असते तर गळ्यांत दावें घालून तिला गोठ्यांत बांधून ठेवली असती काय? ही काय आओीला वागवायची रीत आहे? हा केवळ धार्मिक वेडगळपणा आहे, हें आणखीही

अेका गोष्टीवरून सिद्ध होतें. खऱ्या मातेचें मूत्र कोणी पीत नाही, पण गोमूत्र प्याल्याने पुण्य लागतें म्हणे! हा आचरटपणा नाहीतर काय? गाय उपयुक्त जनावर आहे हें कबूल. पण म्हैस हें त्याहूनही उपयुक्त जनावर आहे. गाय दूध देते म्हणून जर तिला माता म्हणायचें असेल, तर म्हैस माता कां नव्हे? बहुतेक लोक म्हशीचेंच दूध पितात आणि तें केवळ गायीचें मिळत नाही म्हणून नव्हे, तर म्हशीचें दूध जास्त पौष्टिक असतें म्हणून. गायीचें दूध केवळ लहान मुलांकरतां चांगलें समजतात, कारण त्यांत चरबी कमी असते आणि यामुळें तें मुलांना अधिक चांगलें पचतें. पण अितरांना म्हशीचेंच दूध चांगलें, याबद्दल कोणीही समंजस मनुष्य शंका घेणार नाही. ज्याला गोमांस खायचें नसेल त्याने खाऊं नये, पण ज्याला खायचें असेल त्याला अडथळा करण्याचा हक्क कोणालाही पोंचत नाही. म्हणूनच नेहरूंनीही परवां म्हटलें की गोवधबंदी ही राजकीय चळवळ आहे आणि तें खरेंच आहे. हिंदु जर या चळवळीला पाठिंबा देतील, तर ते खुळे आहेत. त्यांत त्यांचा कोणताही फायदा नाही अितकेंच नव्हे तर हा हिंदूंचा धर्मच नव्हे. धार्मिक कारणाकरतां जैनांनी वाटल्यास पाठिंबा द्यावा. तोही मूर्खपणाच होअील, पण धार्मिक लोकांना हें सांगून काय फायदा? त्यांना मूर्खपणा चालतो. गुरुजी धर्माच्या नांवावर थापा देत आहेत. राजकारणांत हें चालायचेंच, पण शहाण्या माणसांनी तरी या थापांवर विश्वास ठेवूं नये.

धनुर्धारीच्या दिवाळी अंकांत दुर्गा भागवत यांनी अीश्वराची कल्पना भुतांवरून निघालेली आहे अशा आशयाचा अेक लेख लिहिलेला आहे, आणि ठाण्याचे प्रसिद्ध थिआसोफिस्ट श्री. भागवत यांनी उलट बाजूने भुतांची कैफियत मांडली आहे. पहिल्या लेखांत भुतें म्हणजे केवळ कल्पना आहे, तींत तथ्य नाही, असें सांगितलें आहे, तर दुसऱ्या लेखांत भुतें असतात हें सप्रमाण सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. मला भूत कधीं दिसलें नाही आणि ज्यांचा भुतांवर विश्वास नाही, त्यांना तीं कधीं दिसतच नाहींत. मुंबईंतले भुतांचे व्यापारी श्री. ऋषि हे भुतें दाखवतात म्हणतात, पण त्यांना

देखील श्रद्धाळू लोकच पाहिजे असतात, कारण श्रद्धा असली तरच तीं दिसतात. पण श्रद्धेने डोळ्यांची शक्ति वाढत असेल असें मानायला कांही आधार नाही. श्री. भागवतांनी भुतें मानणाऱ्या कांही शास्त्रज्ञांचीं नांवें पुरावा म्हणून दिलीं आहेत, पण ते कितीही मोठे शास्त्रज्ञ असले तरी तो पुरावा म्हणून मी मानीत नाही, कारण ते आपल्या विषयांत कितीही प्रवीण असले आणि त्यांनी जरी नोबेल प्राअिझ मिळवलें असलें, तरी त्यांची वृत्ति बुद्धिवादी असतेच असें नाही. उदाहरणार्थ सर जेम्स जीन्स आणि सर आर्थर अेडिंग्टन हे दोन प्रसिद्ध शास्त्रज्ञ अीश्वर मानतात. म्हणून अीश्वराचें अस्तित्व सिद्ध झालें असें होतें काय? बिलकुल नाही. अीश्वर मानायला त्यांनी जीं कारणें दिलीं आहेत, त्यांतून ते बुद्धिवादी आहेत असें दिसत नाही. अेखाद्या विषयांत प्रावीण्य संपादून नोबेल प्राअिझ मिळवतां येतें, परंतु त्यावरून कोणत्याही विषयांत मूलगामी विचार करण्याची पात्रता सिद्ध होत नाही. भागवत म्हणतात, मनुष्याला अेक दृश्य शरीर आणि शिवाय दोन अदृश्य शरीरें असतात. अदृश्य शरीरें जर मानायचीं, तर मग दोनच कां, दहा कां नाहीत? भुतांबद्दल ज्याप्रमाणें ते शास्त्रज्ञांची साक्ष देतात, त्याचप्रमाणें आपल्या अनेक साधुसंतांनी अीश्वराचा साक्षात्कार झाल्याचें सांगितलें आहे. ते शास्त्रज्ञही खोटें बोलत नाहीत आणि साधुसंतही खोटें बोलत नाहीत. पण जें सर्वांच्या डोळ्यांना दिसत नाही, फक्त कांहीनाच दिसतें, तो श्रद्धेमुळें उत्पन्न झालेला आभासच असला पाहिजे असें मला वाटतें. आभास होणें ही अपवादात्मक गोष्ट नाही.

शिवाय कोणत्या गोष्टीला किती पुरावा लागतो, याचाही विचार केला पाहिजे. ज्या गोष्टी संभाव्य आहेत, म्हणजे ज्या बुद्धिवाद्यांना संभाव्य वाटतात, त्यांना फार थोडा पुरावा पुरतो. हा प्रश्न मनुष्यावर विश्वास ठेवण्याचा नाही, घटनांवर विश्वास ठेवण्याचा आहे. त्या जर अगदीच असंभाव्य वाटल्या, तर त्यांना कोणताही पुरावा कदाचित् पुरणार नाही. भुतांचें किंवा अीश्वराचें अस्तित्व या गोष्टी बुद्धिवाद्यांना अितक्या अशक्य वाटतात, की त्यांना कोणींही

खऱ्या म्हटल्या, तर तो आभास श्रद्धेमुळें उत्पन्न झाला असावा, असेंच बुद्धिवादी मनुष्य म्हणणार. ज्यांना या गोष्टींपासून समाधान होत असेल, त्यांनी त्या खुशाल मानाव्या, पण ती श्रद्धा, पुरावा नव्हे.

'समता' मासिकाच्या गेल्या अंकांत अनेक आंतरजातीय विवाह केलेल्यांचे अनुभव दिले आहेत, त्यांवरून असें दिसतें की हे विवाह जरी दोन्ही बाजूंच्या आओबापांच्या मर्जीविरुद्ध झालेले असले, तरी त्यांपैकीं बहुतेक आओबाप शेवटीं आपला आग्रह सोडतात आणि वधूवरांना आत्मीयतेने वागवूं लागतात. यावरून अशीं लग्नें ज्यांना करावींशीं वाटतील, त्यांनी आओबापांच्या मताला विशेष महत्त्व देण्याचें कारण नाही. त्यांनी खुशाल आपल्या मर्जीप्रमाणें लग्नें करावीं. आओबाप विशेष हट्टी असतील तरच तीं जन्मभर आपला हट्ट चालवतील, पण याचा अर्थ अितकाच की त्यांच्याकडून मदतीची अपेक्षा ठेवूं नये. ज्यांना स्वतंत्र रीतीने संसार चालवण्याची धमक असेल, त्यांनीच अशीं लग्नें करावीं हें ओघानेच आलें.

डॉ. जयकरांनी गणेशखिंड योजनेच्या बाबतींत पुण्यातल्या दोन कालेजांच्या मुख्यांना जें धमकीवजा पत्र लिहिलें आहे, त्यावरून त्यांना शिष्टाचार देखील कळत नाही असें दिसतें. भाषाप्रभुत्वाबद्दल जयकरांची ख्याती मीं अकली होती, तींत कांही अर्थ असला तर त्यांनी मुद्दामच उद्दामपणाची भाषा वापरली असली पाहिजे. हें त्यांच्या दर्जाला शोभत नाही. विरुद्ध बाजूने वकिलांचा सल्ला घेऊन तो प्रसिद्ध केला, म्हणून त्यांना अितकें चिडण्याचें काय कारण होतें? ते मोठे कायदेपंडित आहेत आणि अेके काळीं वरिष्ठ कोर्टाचे न्यायाधीश होते हें मला माहीत आहे, पण म्हणून काय कोणत्याही वकिलाचें मत त्यांच्यासारखेंच असलें पाहिजे असें थोडेंच आहे? मला वाटतें जयकरांना अितकें कळलें पाहिजे होतें.

श्री. भारतन् कुमारप्पा यांनी लोकसत्तेंत संततिनियमनाविरुद्ध तारे तोडले आहेत, पण हें सनातनी तत्वज्ञान अितकें जुनें आहे की त्यांत आतां उत्तर देण्यासारखें देखील कांही राहिलें नाही. अर्थात् त्यांनी गांधींचा हवाला

दिलाच आहे, पण गांधी काय किंवा त्यांचे गुरु टॉलस्टॉय काय, म्हातारपणीं ब्रह्मचर्याचा उपदेश कोणीही करील. तरुणपणीं आपण काय केलें याची आठवण त्यांना रहात नाही. गांधींनी स्वतः आपल्या चरित्रांत लिहून ठेवलें आहे की त्यांचे पिताजी मृत्युशय्येवर असतांना देखील त्यांना बायकोजवळून हालवलें नाही. टॉलस्टॉय म्हणतो की दोन मुलें झाल्यावर कोणी बायकोजवळ जातां कामा नये. पण गांधींना चारपांच मुलें झालीं आणि टॉलस्टॉयला तेरा झालीं असें मी कोठेतरी वाचल्याचें आठवतें. तरी दोघेही लोकांना ब्रह्मचर्याचा उपदेश करायला तयार !

कुमारअप्पांच्या लेखावर टीका करतांना लोकसत्ताकार म्हणतात, 'स्त्रीचें व्यक्तित्व जेव्हां पूर्ण विकास पावेल, तिला आपल्या व्यक्तिमत्वाची जेव्हां जाणीव होअील, तेव्हांच संयमाचें तत्वज्ञान व्यवहारांत उतरण्याची शक्यता आहे.' याला त्यांनी रसेलचाही हवाला दिला आहे, पण याचा अर्थ त्यांनी या संयमाच्या तत्वज्ञानाचा खोल विचार केलेला नाही असाच दिसतो. गांधींचे म्हणणें असें होतें की संततिनियमन करण्याकरतां स्त्रियांनी पुरुषांना नकार द्यायला शिकलें पाहिजे. याचा सरळ अर्थ असा की स्त्रियांना कामवासना बिलकुल नसते, त्या केवळ पुरुषांच्या आग्रहामुळें समागमास तयार होतात, त्यांना व्यक्तिमत्वाची जाणीव झाली म्हणजे त्या साहजिकच पुरेशीं मुलें झाल्यावर पुरुषांना नकार देतील. अशीच लोकसत्ताकाराचीही कल्पना दिसते. पण ही वस्तुस्थिति नाही. प्रसूतीचे कष्ट जरी स्त्रियांनाच सोसावे लागतात, तरी प्रसूतिवैराग्य फार थोडा काळ टिकतें. गांधींच्या म्हणण्याप्रमाणें मुलांत पांच वर्षें अंतर ठेवायचें म्हटलें, तर अेक मूल झाल्यावर पांच वर्षेंपर्यंत स्त्रियांनी पुरुषांना नकार देत राहिलें पाहिजे. स्त्रियांनी बिलकुल कामवासना नसेल तरच हें शक्य आहे, अेरवीं नाही. पण हें केवळ अज्ञान आहे. गांधींना तें शोभलें, अितरांना शोभणार नाही. व्यक्तिमत्वाच्या जाणिवेने किंवा संस्कृतीची पातळी उंचावल्याने कामवासना नाहीशी होत नाही किंवा संयमाची शक्तिही वाढत नाही.

तुझी शारदा

---

**समाजस्वास्थ्य** मासिक दर १४ तारखेला टपालांत पडतें. वर्गणी रु. ३, व्ही. पी. ने रु. ३-६-०

## आमचेकडे मिळणारा माल

**लॅबट डच कॅप**, रु. ५. **अमेरिकन**, रु. ८. **उभट टोपी**, रु. ११. **कॉर्ट्सेप्टॅलीन** ( देशी जेली, मोठी नळी ) रु. ३. **कोरोमेक्स जेली** ( अमेरिकन, मोठी नळी) रु. ४. **पिशव्या**, ४ आणे, ८ आणे, १० आणे, रु. १।. **भोंवऱ्याची पिचकारी**, रु. ७. **राअिटयूब** ( रोगप्रतिबंधक ), रु. १, डझनास रु. ११.

**राइट एजन्सी**, १३ भटवाडी क्रॉस लेन, मुंबई ४.

दुसरी हिंदी आवृत्ति

## सं त ति नि य म न

लेखक, र. धों. कर्वे.

किंमत सवा रुपया

**राअिट अेजन्सी**, १३ भटवाडी क्रॉस लेन, मुंबई ४.

**आयुर्वेद सेवा संघ, नाशिक**, या संस्थेने तयार केलेल्या **धातुपौष्टिक वड्या "कंदर्प वृष्य पाक"**.

अर्धा शेर पाकांत सुमारें ४० वड्या येतात. १ वडी सकाळीं व १ वडी रात्रीं झोंपतांना, याप्रमाणें २० दिवस हें धातुपौष्टिक औषध खाऊन वर कप, अर्धा कप दूध पीत जावें. अेक रत्तल वड्यांची किंमत ट. खर्चासह रु. ७-१४-०. मुंबईतील विक्री केंद्रें :- ( १ ) दि सूर्यकिरण फार्मसी लि०, १७३ गिरगांव रोड, मुंबई-४. ( २ ) सर्वौषधि संग्रहालय, पोलीस चौकी मारुतीजवळ, दादर, मुंबई-२८.

Registered No. B 2289.


## प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत इतर पुस्तकें

१. **क्लैब्याची मीमांसा**, किंमत रु. ६, ट. ८ आणे
२. **आधुनिक आहारशास्त्र**, किं. १॥ रु., ट. ख आणे
३. **आधुनिक कामशास्त्र** [ सचित्र ], ९ वी आवृत्त किंमत रु. ४, ट. ख. ८ आणे.
४. **संततिनियमन** [सचित्र], १० वी आ. १। रु. ट. ख. ७ आ.
५. **गुप्त रोगांपासून बचाव**, ४ थी आ. रु. १, ट. ख. ७आणे
६. **'समाजस्वास्थ्य'** मासिकांतील निवडक लेख, भाग २ रा [ वर्षें ४–५–६ ], किं. २–०–०, ट. ख. ८ आ.
७. **त्वचेची निगा**, किं. ८ आ., ट. ख. ७ आ.
८. **गुरुबाजी** (नाटक), किं. ८ आ., ट. ख. ७ आणे
९. **वेश्याव्यवसाय**, किं. २ रु., ट. ख. ८ आ.
१०. **तेरा गोष्टी**, किं. १ रु. ट. ख. ७ आ.
११. **न्यायाचा शोध** (नाटक), किं १ रु., ट. ख. ७ आ.
१२. **पॅरिसच्या परी** (दुसरी आवृत्ति) रु. ३., ट.. ख. ८ आणे

### डॉ. के. भा. लेलेकृत

१. **बाहेरख्यालीचे दुष्परिणाम**, २ री आ., किं. ५ आ.
२. **मूळव्याध**, किं. ४ आ.

### श्री. शकुंतला परांजपेकृत

1. Three years in Australia, Rs. 3/15. Postage As. 8
२. **पाळणा** लांबवायचा कीं थांबवायचा, किं. ८ आ., ट. ख. ७ आ.

**राइट एजन्सी**, नं. १३, भटवाडी क्रॉस लेन, मुंबई नं. ४.


मुद्रण स्थळः—पॉप्युलर प्रेस, (मुंबई) लिमिटेड, ३५, ताडदेव रोड, मुंबई–७

मुद्रक व प्रकाशकः—**रघुनाथ धोंडो कर्वे, राइट एजन्सी,**
नं. १३, भटवाडी कॉस लेन, गिरगांव, मुंबई–४